## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने तिसरे बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलन सोमवार दि. १० मार्च रोजी अमळनेरच्या प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात होणार आहे. या संमेलनात १५० विद्यार्थी साहित्यिक सहभागी होतील.

अमळनेर येथे विद्यापीठाचे प्रताप तत्त्वज्ञान केंद्र असून या केंद्रात सोमवार दि. १० मार्च रोजी एक दिवसाचे हे विद्यार्थी साहित्य संमेलन होणार आहे. म्हसदी येथील स्व. आर.डी. देवरे महाविद्यालयाचे प्राचार्य तथा साहित्यिक डॉ. संजीव गिरासे यांच्या हस्ते सकाळी १० वाजता या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, संमेलनाचे कार्याध्यक्ष तथा व्य.प. सदस्य ॲड अमोल पाटील,नितीन झाल्टे, प्रा. शिवाजी पाटील हजर राहणार आहेत. दिवसभर चालणा-या या संमेलनात विद्यार्थ्यांचे स्वलिखित काव्यवाचन स्पर्धा, कथाकथन, परिसंवाद, बोलीभाषा स्पर्धा असे कार्यक्रम होणार आहेत. या संमेलनाचा समारोप सायंकाळी ५ वाजता कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. अशी माहिती विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) डॉ. रेखा पाहुजा, प्राचार्य डॉ. वैशाली पाटील यांचे व्याख्यान आणि विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक सादरीकरण अशा विविध कार्यक्रमांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात जागतिक महिला दिन साजरा झाला.

अंतर्गत तक्रार निवारण समिती विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात जागर महिला सुरेक्षेचा या विषयावर झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर व्य.प. सदस्य डॉ. पवित्रा पाटील, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. नीता पाटील, डॉ. वैशाली पाटील, डॉ. रेखा पाहूजा,सिनेट सदस्य सुरेखा पाटील उपस्थित होते. यावेळी प्रा. इंगळे यांनी लैंगिक समानता आणण्यासाठी मानसिकता बदलण्याची गरज असून स्त्रीयांचा सन्मान करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. पवित्रा पाटील यांनी महिला या सगळयांसाठी प्रेरणादायक असल्याचे मत व्यक्त केले. डॉ. नीता पाटील यांनी प्रास्ताविक केले. मानसी बारी व रेवती पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ.विजय घोरपडे यांनी आभार मानले.

उद्धटनानंतर कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा २०१३ या विषयावर मणियार विधी महाविद्यालयाच्या डॉ. रेखा पाहूजा यांनी व्याख्यान दिले, शिरपूरच्या आर.सी. पटेल परिसंस्थेच्या डॉ. वैशाली पाटील यांनी देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. कविता, नृत्य, या सांस्कृतिक उपक्रमात माधुरी महाजन, प्रेरणा वायकोळे, साक्षी पाटील, सारिका खारवे, रेखा धम्मरत्न आदींनी भाग घेतला. यावेळी रिल निर्मिती स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली यात आनंद जयस्वाल व राहूल चोपडे यांना उत्तेजनार्थ, भाग्यश्री पाटील हिला तृतीय, सचिन पाटीलला द्वितीय व भाग्यश्री ठाकूरला प्रथम क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नंदुरबार येथील आदिवासी अकादमीत शनिवार दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आदिवासी महिलांचे सक्षमीकरण – शाश्वत विकासाठी शिक्षण, हक्क आणि कल्याण यावर आदिवासी महिलांना प्रशिक्षण देण्यात आले.

अक्कलकुवा व नंदुरबार तालुक्याती भांग्रापाणी व टोकरतलाव येथील महिला सहभागी झाल्या होत्या. व्य.प. सदस्य भरत गावीत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास अधिसभा सदस्य जयंत उत्तरवार,दिनेश खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. उत्तरवार यांनी नंदुरबार जिल्ह्यातील कृषी व कृषीपुरक उद्योगात कार्यरत असलेल्या महिलांची कर्तृत्व यावेळी सांगितले.दिनेश खरात यांनी आदिवासी समुदायातील महिलांच्या विकासासाठी योगदान वाढविण्याची गरज प्रतिपादन केले.

यावेळी प्राचार्य नंदा वसावे यांनी महिलांसाठी शिक्षण आर्थिक संधी, प्राचार्य वैशाली शेवाळे यांनी महिलांचे आरोग्य, डॉ.आशा तिवारी यांनी महिलांचे हक्क व कायदेशीर संरक्षण, प्रा.माधव कदम यांनी समुदाय विकासात महिलांची भूमिका यावर

मार्गदर्शन केले. प्रा. स्मीता देशमुख यांनी प्रास्ताविक केले. एस्तेर वळवी यांनी सूत्रसंचालन केले. तर रिता सुळे यांनी आभार मानले. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या नेतृत्वाखाली व अकादमीचे प्रभारी संचालक डॉ.के.एफ.पवार यांच्या पुढाकाराने तीन दिवस अकादमीत विविध कार्यक्रम घेण्यात आले.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ८ मार्च, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी